शनिवार, दि. १९ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३४३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282




## मंठा व परतूर येथे मंजूर करण्यात आलेल्या उपजिल्हा रुग्णालयाला १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन द्या

### आमदार बबनराव लोणीकर यांची शासनाकडे मागणी

**मुंबई । प्रतिनिधी -** राज्य शासनाकडून जालना जिल्ह्यातील मंठा व परतुर या दोन्ही तालुक्याच्या ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय मंजूर करण्यात आले आहेत. हे दोन्ही तालुक्याची ठिकाणे असून जालना-नांदेड व शेगाव-पंढरपूर (दिंडी मार्ग) या दोन राष्ट्रीय महामार्गाने जोडलेले आहेत. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अपघात होत असतात परिणामी अत्यावश्यक सेवा म्हणून लागणारे आयसीयू किंवा ऑक्सिजन यासारख्या सुविधा येथे लवकर उपलब्ध होत नाहीत. या सर्व आरोग्य सुविधा देण्यासाठी या दोन्ही उपजिल्हा रुग्णालयांना मंजुरी देण्यात आली आहे. हे दोन्ही उपजिल्हा रुग्णालयाला तत्कालीन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांच्या हाय पावर कमिटीची मान्यता होती, वारंवार त्यासाठी मंत्री महोदयांच्या दालनात बैठका घेण्यात आल्या होत्या. राज्य सरकारकडून निधी मंजूर करून त्या संदर्भातील जीआर काढण्यात आला. परंतु या दोन्ही उपजिल्हा रुग्णालयासाठी लागणारा निधी उपलब्ध झाला नाही. या दोन्ही उपजिल्हा रुग्णालयासाठी प्रत्येकी ५० कोटी रुपये प्रमाणे १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी अवचित त्याच्या मुद्द्याद्वारे आमदार बबनराव लोणीकर यांनी विधानसभेत केली.




पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, राष्ट्रीय आरोग्य अभियान अतर्गत यापूर्वी २ वेळा डीपीआर पाठवण्यात आला होता. आता देखील पुन्हा एकदा राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नव्याने डीपीआर पाठवण्यात आला आहे. दिनांक २६ जुलै २०२३ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन नियमाप्रमाणे मंठा येथील ३० खाटांवरुन ५० खाटांचे श्रेणीवर्धीत उपजिल्हा रुग्णालयाचे मुख्य इमारत बांधकामाचे रु.२७.१० कोटी व अधिकारी/कर्मचारी निवासस्थान बांधकामाचे बांधकामाचे रु.२२.६० कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. या दोन्ही उपजिल्हा रुग्णालयाच्या मुख्य इमारत कर्मचारी निवासस्थान संरक्षण भिंत अंतर्गत रस्ते यासह इतर बाबींसाठी प्रत्येकी ५० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे असेही लोणीकर यावेळी म्हणाले.

चारही प्राथमिक आरोग्य केंद्राला प्रत्येकी १० कोटी रुपये प्रमाणे ४० कोटी रुपये निधी द्या- आ. लोणीकर*

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जालना जिल्ह्यातील परतूर मंठा मतदार संघात सन २०२३-२४ मध्ये एकूण ४ प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यात आले होते. सदरील आष्टी, वाटूर, दहिफळ खंदारे व ढोकसाळ चार प्राथमिक आरोग्य केंद्रांना प्रत्येकी १ कोटी ४३ लक्ष असा निधी मंजूर करण्यात आला होता परंतु सदरील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्र हा निधी अपुरा आहे. सदरील चारही प्राथमिक आरोग्य केंद्रास प्रत्येकी १० कोटी रुपये प्रमाणे ४० कोटी रुपये निधी मुख्य इमारत व कर्मचारी निवासस्थान याकरिता राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मंजूर करावा अशी मागणी देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी औचीत्याच्या मुद्याद्वारे आज विधानसभेत मागणी केली.

केंद्र सरकारने दिलेला प्राथमिक आरोग्य केंद्राचा १ कोटी ४३ लाख रुपये निधी परिपूर्ण परिपूर्ण प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यासाठी कमी पडत असला जो निधी शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे त्या निधीची अद्याप पर्यंत निविदा न झाल्यामुळे तो निधी परत जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री, अर्थमंत्री व सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांनी पुढाकार घेऊन संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी मंजूर असलेल्या निधीची तात्काळ निविदा करावी, जेणेकरून ही रक्कम परत जाणार नाही. उपलब्ध रकमेतून जेवढे होईल तेवढे काम पूर्ण करून उर्वरित कामासाठी लागणारी रक्कम लवकरात लवकर मंजूर करावी असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

## राजकारणातील निष्कलंक अन् लोकप्रिय नेतृत्त्व

### खासदार डॉ. काळे यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन कार्यक्रम

**जालना । प्रतिनिधी -** जालना लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या वाढदिवसानिमित्त महाविकास आघाडी जालनाच्यावतीने शनिवार (दि १९) रोजी मातोश्री लॉन्स अंबड रोड येथे सकाळी दहा वाजता अभिष्टचिंतनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी केले आहे.

१९८९ पासून जालना लोकसभा मतदार संघ हा भाजपाच्या ताब्यात होता. कॉग्रेसकडून स्व. अंकुशराव टोपे यांच्या विजयाचा अपवाद वगळता १९९६ पासून या मतदारसंघात काँग्रेसला विजय मिळालेला नव्हता. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत डॉ. कल्याण काळे यांनी कमी वेळेत सत्ताविरोधी मतदार एकत्रित करण्याची किमया साधली अन् भाजपाचा पराभव केला. यापूर्वी २००९ च्या विधानसभा (विधानसभा) फुलंब्री विधानसभा मतदारसंघाचे आणि २००४ मध्ये औरंगाबाद पूर्व विधानसभा आमदार काम पाहिले होते.

डॉ. काळे हे सामाजिक कार्यासह शैक्षणिक कार्यात देखील अग्रेसर आहेत. त्यांच्या अनेक शैक्षणिक संस्था आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी त्यांनी निर्माण करून दिली आहे. त्यांनी शिक्षण, आरोग्य आणि ग्रामीण विकासासंबंधी योजनांना नेहेमीच प्रोत्साहन दिले आहे. ग्रामीण भागातील विकासावर त्यांचे विशेष लक्ष असते.

डॉ. कल्याणराव काळे यांच्या नेतृत्त्वामुळे ते आपल्या मतदारसंघात अत्यंत लोकप्रिय आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव आणि कार्यशक्ती लोकांमध्ये विश्वास निर्माण करते. त्यांच्या प्रामाणिकपणामुळे ते काँग्रेस पक्षाच्या एका विश्वासू नेत्यांमध्ये सामाविष्ट आहेत. राजकारणात असो अथवा सामजात त्यांच्यावर साधे आरोपही झालेले नाहीत. त्यामुळे ते राजकारणातील एक निष्कलंक अन् लोकप्रिय नेतृत्त्व ठरते.



# संपादकीय

## बहुविध प्रतिभेचे धनी

जगप्रसिद्ध खगोल - भौतिक शास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक, पद्मविभूषण डॉ जयंत नारळीकर यांचे आज जयंती. डॉ जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रसिद्ध गणीततज्ञ होते. ते वाराणसी येथील बनारस विश्व विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख होते तर आई सुमती या संस्कृत विदुषी होत्या. वाराणसी येथे शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या नारळीकर यांनी १९५७ साली विज्ञानाची पदवी प्राप्त केली. (बीएस्सी ) त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमधील केम्ब्रिज येथे गेले. तिथे त्यांनी बीए,एमए आणि पीएचडी या पदव्या मिळवल्या. शिवाय रँग्लर आणि खगोल शास्त्राचे टायसन मेडल आणि इतर अनेक बक्षिसे मिळवली. त्यांचे पिएचडीचे गाईड डॉ फ्रेड हॉईल यांच्या साथीने त्यांनी स्थिर स्थिती सिद्धांतावर संशोधन केले व जगप्रसिद्ध बिग बँग सिद्धांताला आव्हान देणारा नवा सिद्धांत तयार केला. १९६६ साली नारळीकर यांचा विवाह मंगला राजवाडे ( गणितज्ञ ) ह्यांच्याशी झाला. त्यांना तीन मुली आहेत गीता, गिरिजा लीलावती. १९७२ साली ते मुंबईत परतले. तिथे त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ जयंत नारळीकर यांनी पाच दशकांहून अधिक काळ खगोल आणि भौतिक शास्त्रात संशोधन केले. त्याच बरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू ठेवला. डॉ जयंत नारळीकर हे रुढार्थाने साहित्यिक नसले तरी त्यांनी केलेले लेखन हे दर्जेदार साहित्यिकापेक्षा कमी दर्जाचे नाही. विज्ञान कथे सारखा वेगळा प्रवाह मराठी साहित्यात रुजविण्याचे मोठे काम त्यांनी केले. विज्ञाना सारखा रुक्ष आणि अवघड विषय ललित साहित्याच्या अंगाने मांडून त्याला सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवण्याचे अवघड व महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी केलेले विज्ञानविषयक लेखन व सुरस विज्ञान कथा यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागली. खगोल शास्त्रात सातत्याने संशोधन करत असताना डॉ जयंत नारळीकरांनी लेखनही चालू ठेवले. त्यांनी अनेक विज्ञानकथा लिहिल्या. त्यांची यक्षाची देणगी, अंतराळवीर, भस्मासुर, टाइम मशीनची किमया, प्रेषित, अभयारण्य, याला जीवन ऐसे नाव, वामन परत आला, गणितातील गमतीजमती, नभात हसरे तारे, नव्या सहस्त्रकाचे नवे विज्ञान, विज्ञान आणि वैज्ञानिक, विज्ञानगंगेचे अवखळ वळणे, विज्ञानाची गरुडझेप, विज्ञानाचे रयचिते ही पुस्तके गाजली. त्यांनी लिहिलेले आकाशाशी जडले नाते व अंतराळ आणि विज्ञान ही पुस्तके प्रचंड गाजले. ही पुस्तके म्हणजे त्यांच्या दर्जेदार साहित्याचे उत्तम उदाहरण आहेत. तीन नगरातील माझे विश्व हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिध्द आहे. यक्षाची देणगी या त्यांच्या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. सामान्य माणसाला खगोल शास्त्र समजवण्यासाठी त्यांनी अनेक वर्ष प्रयत्न केले. आपल्या लेखनातून त्यांनी अंधश्रद्धा दूर करण्याचाही प्रयत्न केला. बहुविध प्रतिभेचे धनी असलेले डॉ जयंत नारळीकर यांच्यासारख्या व्रतस्थ व्यक्तीमत्वास ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हा त्यांच्या बहुविध प्रतिभेचा गौरव होता. डॉ जयंत नारळीकर यांच्यासारखे जेष्ठ विज्ञानविषयक लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बनल्यामुळे विज्ञान साहित्याला अधिकाधिक प्रतिष्ठा लाभली तसेच विज्ञानाचा प्रसार होण्यास व तरुण पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास त्यांच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा खूप उपयोग झाला. याच वर्षी २० मे २०२५ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने बहुविध प्रतिभेचे धनी असलेले व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. डॉ जयंत नारळीकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## रयतेचे शिवबा

उभ केलं शिवबांना स्वराज्य, रयतेच्या हक्काचे राज्य,
मी आहे शिवबांचा मावळा नाही भिणार या डोमकावळा...
उदरी असता शिवबा, डोहाळे लागे मातेला,
कधी घेई हातामध्ये तलवार, कधी होईल घोड्यावरी स्वार...
मी आहे शिवबाचा मावळा..
लखोजींची कुलीन कन्या, भोसल्यांची सुन ती,
त्रयोगुनांचा वारसा देणारी माता, म्हणून म्हणत्यात तिला राष्ट्रमाता राजमाता राष्ट्रमाता, राष्ट्रमाता राजमाता..
आजच्या मातेला लाजवेल अशी कीर्ती आऊसाहेबांची,
मातेने आजच्या घेऊनी प्रेरणा जिजाऊंची,
द्यावा या मातीला पुन्हा एक रयतेचा छत्रपती,रयतेचा छत्रपती..
मी आहे शिवबाचा मावळा नाही भिणार या डोमकावळा....
अष्टकोनी सिंहासन त्यांचे मंडळ अष्टप्रधान,
नाही केला कधी कुणाचा अवमान नाही मोडीले जनतेचे वचन..
रयतेच्या रक्षणासाठी सोशीला पाऊस,वारा आणि उन,
आरे राजाचे माझ्या गाऊ किती मी गुण..
शिवबा होते लय उदार, करून दुष्टांचा संहार, केला जनतेचा सर्वांगाने उध्दार.. जनतेचा उद्धार..
मी आहे शिवबांचा मावळा नाही भिणार या डोमकावळा....
सोबतीला घेऊन मुठभर मावळे,
पळवून लावी मोठ- मोठे डोमकावळे,
शिवबा होते आमचे लय थोर कीर्ती गाजे त्यांची अपार...
औरंगजेब बादशाह घेऊन येई मोठ्या फौज फाटा,
नाव घेता शंभूचे त्याच्या अंगावर येई काटा....
कणखर बाणा एकच राणा शिवबा नंतर शंभू झाला,
पाहून त्याची कीर्ती चंद्र,सूर्यही लाजला.. चंद्रसूर्य ही लाजला.....
मी आहे शिवबाचा मावळा नाही भिनार या डोमकावळा....

**दत्तू ज्ञानदेव एखंडे सहशिक्षक कै.नानासाहेब पाटील विद्यालय नजीक पांगरी,ता बदनापूर मो.९८२३८८७७१२**

# आम्ही अधिकारी झालो ; प्रेरणादायी यशकथा संग्रह

सौ. अलका देवेंद्र भुजबळ प्रकाशिका 'न्यूज स्टोरी टुडे' तसेच श्री देवेंद्र भुजबळ हे लेखक-संपादक असलेले 'आम्ही अधिकारी झालो!' पस्तीस लेखांचा प्रेरणादायी, अनुकरणीय, मार्गदर्शक असा
यशकथा संग्रह नुकताच वाचण्यात आला. मलपृष्ठावर विषयाशी निगडित अशी रचना आहे, ती ज्येष्ठ गझलकार सुरेश भट यांची!

पुस्तक लेखनाच्या, पुस्तक निर्मितीच्या अनेक आठवणी हृदयात कायम घर करून असतात. ह्या पुस्तकाचे लोकार्पण तत्कालीन राज्यपाल श्री रमेश बैस यांच्या हस्ते मुंबईतील राजभवनात तर प्रकाशन जपान देशात आणि तोही ओसाका ते हिरोशिमा या प्रवासात बुलेट ट्रेनमध्ये झाले. हा एक अद्वितीय असा योगायोग म्हणावा लागेल .

पहिलीच यशकथा अमीट नीला सत्यनारायण यांची विविधांगी माहिती देणारी आहे. त्यांच्या स्वभावाचे वर्णन करताना लेखक लिहितात, 'कडक, शिस्तप्रिय, कणखर, निश्चयी अधिकारी म्हणून त्यांची जशी प्रतिमा होती, तशीच संवेदनशील कवी, गीतकार, लेखक, कला रसिक म्हणून त्यांची प्रतिभा होती.'

उच्च पदांवर कार्य करताना अनेक तडजोडी कराव्या लागतात, आपले आवडीचे छंद जपण्याकडे दुर्लक्ष होते असे असतानाही सत्यनारायण यांची पस्तीस पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या दोन कथांवर चित्रपट निर्माण झाले आहेत. गीतलेखन आणि दूरचित्रवाणी मालिकांसाठीही त्यांनी गीतलेखन केले आहे.

अनेक अधिकाऱ्यांचा प्रवास हा अतिशय कष्टदायी असाच आहे. या पुस्तकातील 'तिकीट कलेक्टर ते डिस्ट्रिक्ट कलेक्टर' या लेखाचे नायक श्री जी. श्रीकांत! ज्ञानलालसा आणि काहीतरी करून दाखवण्याची इच्छा असलेला मानव शांत बसत नाही. दहाव्या वर्गात उत्तीर्ण झाल्यानंतर रेल्वे खात्याचा दोन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करून ते तिकीट तपासणीस या पदावर हजर झाले. पुढे बहिस्थ परीक्षांच्या माध्यमातून बी. कॉम., एम. कॉम झाले. रेल्वेची नोकरी करीत असताना त्यांना गरीब-श्रीमंत ही विषमता बेचैन करीत होती. वेगळं काहीतरी करण्याची ऊर्मी अस्वस्थ करीत होती. कमल या मित्राने श्रीकांत यांना स्पर्धा परीक्षा देण्याची सूचना केली. यामुळे त्यांना एक दिशा, एक मार्ग सापडला. भरपूर अभ्यास करून त्यांनी यश मिळवले. त्यांचा हा प्रवास गोरगरिबांना तारक, मदतगार असा आहे.

रेशीम संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अतिरिक्त आयुक्त महानगरपालिका असे कार्य करणाऱ्या एका कर्तृत्ववान महिलेची यशोगाथा वाचक दरबारी लेखक भुजबळ यांनी आत्मियतेने रेखाटली आहे. आईचं आजारपण जपत यशोशिखरावर पोहोचण्याऱ्या विदर्भ कन्या भाग्यश्री बागायत कठीण परिस्थितीत विविध परीक्षांमध्ये यश मिळवून त्यांनी नागालँडमध्ये विविध पदांवर काम केले. एकदा त्यांच्या सन्मानार्थ आयोजित केलेल्या भोजन प्रसंगी भाग्यश्री यांची उडालेली तारांबळ आणि त्यावेळी त्यांना उपाशी राहावे लागले हे वर्णन रोमहर्षक आहे. महत्त्वाच्या, जबाबदारीच्या पदांवर कार्यरत असताना त्यांनी लेखनाची आवड जोपासली आहे.

दोन सख्खे भाऊ श्री चंद्रकांत डांगे आणि श्री प्रदीपकुमार डांगे चंद्रपूर सारख्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असूनही ग्रामसेवक असलेल्या वडिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून दोघांनीही स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविले. दोघेही बंधू आजच्या तरुणाईचे आदर्श ठरावेत असा त्यांचा मार्गदर्शक प्रवास आहे.

डांगे बंधूंप्रमाणे टिना आणि रिना या दोन भगिनींचा प्रवास उत्कंठावर्धक आहे. आपल्या मुलींची अभ्यासू वृत्ती ओळखून त्यांच्या आई;
हेमाली डाबी कांबळे यांनी
स्वतःच्या उच्च पदाच्या नोकरीचा राजीनामा दिला आणि हेमाली डाबी कांबळे या समर्थपणे मुलींच्या पाठीशी उभ्या राहिल्या आणि मुलींनी इतिहास घडवला.

स्वाती मोहन राठोड या मुलीने अगदी कठीण आणि हलाखीच्या परिस्थितीत स्वतःचे स्वप्न सत्यात उतरवले. वडील मोहन राठोड हे मोलमजुरी करत. यावरून स्वातीची कौटुंबिक, आर्थिक परिस्थिती लक्षात येते. स्पर्धा परीक्षेविषयी एक व्याख्यान ऐकून स्वातीने स्पर्धा परीक्षा देण्याचा मनोमन निश्चय केला परंतु सर्वच दृष्टीने मार्ग खडतर असला तरीही इच्छा असली, कष्ट करण्याची तयारी असली की मार्गक्रमण करण्याची स्फूर्ती मिळते. अशा कठीण परिस्थितीत एकानंतर एक परीक्षेत यश मिळवत ती इतर मुलींसाठी आदर्श ठरली.

लहानपणीच वडिलांचा मृत्यू झाल्यानंतर आईने दारु विक्रीचा व्यवसाय स्वीकारल्यामुळे घरी येणाऱ्या गिऱ्हाईकांची बोलणी ऐकताना 'मी आता अभ्यास करीत आहे, मी नाही जाणार.' असा स्वाभिमान जपणाऱ्या राजेंद्र यांची कहाणी खरोखर चित्तथरारक आहे. राजेंद्र लहान असताना भूक लागली म्हणून तो रडायचा तेव्हा त्याच्या आवाजाने त्रस्त झालेले दारु प्यायला आलेले कुणीतरी त्याच्या तोंडात चक्क दारुचे थेंब टाकायचे, परिस्थिती किती हवालदिल बनवते याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे राजेंद्रची आजीही दूध नसल्यामुळे त्याला दारु पाजायची. वाचताना अंगावर काटा उभा राहतो. विचार करण्यासारखी गोष्ट अशी की, असे वातावरण असलेल्या मुलाचे भविष्य कसे असेल? परंतु राजेंद्र यांनी अशा प्रतिकूल परिस्थितीवर धाडसाने नि कष्टाने मात आपल्या स्वप्नाला गवसणी घातली आणि उच्च पदावर कार्यरत होण्याची जिद्द पूर्णत्वास नेली.

नामांकित अधिकारी श्री तुकाराम मुंढे यांच्या अमरावती येथे झालेल्या सत्कार समारंभात एक मुलगी उपस्थित होती. मुंढे यांच्यापासून प्रेरणा मिळालेली ती युवती होती पल्लवी चिंचखेडे! तिनेही मनोमन ठरवले की, मलाही असेच यश मिळवून उंच भरारी घ्यायची आहे. तेव्हा पल्लवी अमरावतीत कुटुंबीयांसह झोपडपट्टीत राहत होती, वातावरणाचा गलबला असायचा, झोपडपट्टीजवळून जाणाऱ्या नागपूर - मुंबई ह्या सुपर एक्सप्रेस हायवेवरून जाणाऱ्या वाहनांचा कर्कश आवाज पल्लवीची अभ्यासाची ध्यान मुद्रा भंग करत नसे. अशा परिस्थितीत पल्लवी स्पर्धा परीक्षेत यशस्वी झाली. पल्लवीची यशोगाथा प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे यांनी अत्यंत जिव्हाळ्याने व्यक्त केली आहे.

'माना कि अंधेरा बहुत घना है, मगर किसने कहा, दिया जलाना मना है?' असा आशादायी विचार करून स्वप्न सत्यात उतरवणारे अनेक तरुण आहेत. ऋषिकेश ठाकरे या तरुणाच्या वाटचालीचे लेखन प्रा. मोहन खडसे यांनी केले आहे. लहानपणी अभ्यासात विशेष गोडी नसलेल्या ऋषिकेशला सुरुवातीला त्याच्या आजीने सतत प्रोत्साहन दिले. ऋषिकेशची इंग्रजी विषयाची भीती पळवून, गोडी लावण्यात शिक्षकांनी महत्त्वाची भूमिका बजावली, त्यामुळे मूळातच अत्यंत बुद्धिमान असलेल्या ऋषिकेशला योग्य मार्ग सापडला, दहावी-बारावी दोन्ही परीक्षांमध्ये नव्वद टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून यशस्वी झाला.

'सदैव हसतमुख राहून काम करणाऱ्या अधिकारी...' अशी ख्याती असलेल्या वर्षा ठाकूर घुगे ह्या मध्यमवर्गीय कुटुंबातून पुढे येऊन अविस्मरणीय अशी कामगिरी करणाऱ्या महिला अधिकारी आहेत. बी.ए. (डिफेन्स) ह्या अत्यंत कठीण विषयाची पदवी मिळवून, कायद्याची पदवी केल्यानंतरही स्वस्थ न बसता ठाकूर यांनी एमपीएससीची परीक्षा यशस्वीपणे पार पाडली. मराठवाडा विभागातील पहिल्या महिला उपजिल्हाधिकारी होण्याचा विक्रम त्यांनी नोंदवला. प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करताना वर्षा यांनी अनेक समाजाभिमुख योजना राबविण्यासाठी भरपूर परिश्रम घेतले आहेत.

महामहिम राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांची 'यश तेव्हाच मिळते ज्यावेळेला तुम्ही ३उ ची कठोर साधना कराल. पहिला उ म्हणजे कमिटमेंट, दुसरा उ. म्हणजे कन्सिस्टन्सी, तिसरा उ म्हणजे कॉन्फिडन्स. या तिन्हीचा समन्वय असला तर, यशोदेवी तुम्हाला यश नक्कीच देते...' ही शिकवण गुरुमंत्र मानून आपल्या ध्येयाकडे यशस्वीपणे वाटचाल करणारे आशिष उन्हाळे यांची कामगिरी कौतुकास्पद अशीच आहे.




आई ही पहिली गुरू असते. आपल्या मुलींची अभ्यासात प्रगती व्हावी, त्यांनी उच्च पदस्थ अधिकारी व्हावे या हेतूने कृष्णाबाई सातपुते या शिक्षिकेने आपल्या मुलींना शाळेव्यतिरिक्त अभ्यास करून उज्वल यश मिळावे म्हणून व्यवसायमाला आणून दिल्या. काही दिवसांनी त्यांनी त्यासंदर्भात चौकशी केली तेव्हा मुलींनी काहीच लिहिले नाही हे पाहून कृष्णाबाई एका शिक्षिकेच्या भूमिकेतून कडाडल्या,'तुम्हाला अभ्यास करायचाच नसेल तर, ह्या व्यवसायमालांचा घरात काय उपयोग? बाहेर शेकोटी पेटलेली आहे, त्यात टाकून देऊ!' हे बोल मुलींच्या मनावर आघात करून गेले. त्यानंतर तेजस्वी सातपुते यांनी मागे वळून पाहिले नाही. त्यांची पावलं ईप्सित साध्य करण्यासाठी कठोर परिश्रमाच्या मार्गावर निघाली. पुढे तेजस्वी यांनी शिक्षण क्षेत्रात भरपूर यश मिळवून त्या पोलीस अधीक्षकपदी रुजू झाल्या.

आईवडील हे सातत्याने आपल्या मुलाच्या यशस्वी भवितव्यासाठी झटत असतात, प्रसंगी अर्धपोटी राहून मुलांना शिकवत राहतात, अनेकवेळा परिवारातील भाऊ, बहीण, मावशी, आत्या, काका, काकू, मामा, मामी इत्यादी नातेवाईक आपल्या पाल्याचा उत्कर्ष व्हावा म्हणून खूप परिश्रम घेत असतात. पश्चिम बंगाल राज्यात सह पोलीस आयुक्त म्हणून शुभम जाधव यांच्या चिकाटीची, जिद्दीची यशकथा लिहिली आहे, शुभम यांच्या आत्या आशा दळवी यांनी! दळवी यांनी सांगितलेला शुभमचा जीवनपट प्रेरणादायी आहे.

'अभी तो नापी है, बस मुट्ठीभर जमीन, अभी तो सारा आसमान बाकी है...!' याप्रमाणे अनेक जण जे मिळालं त्यात समाधान न मानता त्यापुढे कसं जाता येईल हा विचार करून मार्गक्रमण करतात कारण त्यांचा स्वतःच्या बुद्धीवर, चिकाटीवर, कठोर परिश्रमातून यश मिळविण्यावर विश्वास असतो म्हणूनच केवळ पाच वर्षाची असताना आईवडिलांचे छत्र हरवलेली प्रांजली बारस्कर ही मुलगी संकटं, अडीअडचणी यावर मात करून जेव्हा सहायक आयुक्त या पदावर आरुढ होते तेव्हा तिची प्रामाणिक धडपड पाहून डोळे ओलावतात.

वाचण्याची आवड किती असावी हा खरेतर व्यक्तिपरत्वे वेगवेगळा अनुभव असू शकतो परंतु रात्री घरातील लाईट बंद झाल्यानंतरही देव्हाऱ्यात तेवणाऱ्या दिव्याच्या अंधूक प्रकाशात वाचन करणारी अशी एक वाचन वेडी म्हणजे स्वकर्तृत्वाने पोलीस उपअधीक्षक पदावर झेप घेणाऱ्या सुनीता कुलकर्णी! मीरा बोरवणकर यांना आदर्श मानून पोलीस खात्यात नोकरी करण्याचा केलेला प्रण मोठ्या जिद्दीने पूर्ण करणाऱ्या सुनीता कुलकर्णी यांचे अनुभव अनुकरणीय असेच आहेत.

लेफ्टनंट कर्नल महेंद्र सासवडे यांचा जीवनप्रवास वाचकांपुढे अत्यंत तळमळीने मांडला आहे, सौ. रश्मी हेडे यांनी! त्यांनी लिहिलेले, 'अग्निदिव्यातून सोन्यालाही जावे लागते त्याशिवाय ते उजळत नाही, तसेच भारतीय सैन्यदलात उच्च पदवी प्राप्त करण्यासाठी त्या उमेदवारांना देखील कठोर परिश्रम करावे लागतात. अनेक परीक्षांचा सामना करावा लागतो. ही परीक्षा सलग पाच दिवस असते.अतिशय प्रगत मानसिक, शारीरिक कसोट्या लावून निवड समिती योग्य उमेदवारांची निवड करते.' हे वाक्य कर्नल सासवडे यांनी घेतलेल्या कष्टाची योग्य मांडणी करते.

'कँटिनबॉय ते जॉईंट सेक्रेटरी' हे शीर्षक यश कथेतील नायकाच्या हृदयस्पर्शी वाटचालीची साक्ष देते. राजाराम जाधव यांनी शिक्षणासाठी जितके कष्ट घेतले तितकेच परिश्रम त्यांनी शासकीय पदावर असताना घेतले. महत्त्वाची जबाबदारी पार पाडत असताना जाधव यांनी अविरतपणे साहित्य सेवा केली आहे. श्री भुजबळ यांनी राजाराम जाधव यांचं विद्यार्थी जीवन, उच्चपदस्थ अधिकारी आणि लेखक हा त्रिवेणी संगम या लेखात आपुलकीने लिहिला आहे.

एखादेवेळी आपण ठरवतो एक परंतु अमाप कष्ट करूनही जेव्हा यशश्री प्रसन्न होत नाही तेव्हा सारेच काही संपले असे नसते, एक मार्ग बंद होत असताना प्रयत्नवादी, हार न मानणारी व्यक्ती दुसरा मार्ग ज्याला 'प्लॅन बी' म्हणतात तो तयार ठेवतो आणि त्या 'बी' मार्गाने कठोर परिश्रम करून यशस्वी होतो. असाच 'प्लॅन बी' चा अवलंब करून सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी या पदापर्यंत झेप घेतली ती पवन नव्हाडे यांनी! नव्हाडे यांची कामगिरी सुयोग्य शब्दांत श्री भुजबळ यांनी चितारली आहे.

अनेक उच्च पदस्थ अधिकाऱ्यांची विद्यार्थी दशेतील आर्थिक स्थिती हलाखीची असल्यामुळे शिक्षणासाठी पडेल ते काम करून, प्रसंगी अर्धपोटी राहून अभ्यास केला असल्याचे आपणास या यशोगाथा पुस्तकात वाचायला मिळते. या दिव्यातून तावूनसुलाखून निघून स्वतःची यशमाला इतरांपुढे ठेवणारे, इतरांना आशेचा दीप दाखविणारे वाय.जी. कांबळे यांचा 'डेअरीबॉय ते विक्रीकर सहआयुक्त' हा कष्टप्रद प्रवास इतरांना अनुकरणीय ठरावा असा आहे.

या लेखमालेतील एक नायक स्वतः श्री देवेंद्र भुजबळ आहेत.आपण स्वतः जे भोगलंय,पाहिलंय, अनुभवलंय तेच अनेक अधिकाऱ्यांनी सोसलंय हे त्यांच्या सारख्या अभ्यासू लेखक, व्यासंगी अधिकारी, आणि प्रकाशक यांनी हेरलं. या सर्वांच्या प्रवासाला वाचकांसमोर, विद्यार्थ्यांसमोर ठेवून या प्रवासातून अनेकांनी प्रेरणा घेऊन स्वतःला ठामपणे, आत्मविश्वासाने घडवावे या प्रामाणिक हेतूने त्यांनी अनेक अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन त्यांचा गौरवशाली इतिहास पुस्तकाच्या माध्यमातून प्रकाशित केला आहे. स्वतः श्री भुजबळ यांनी माहिती संचालक म्हणून मंत्रालयात पदोन्नती मिळेपर्यंतची धडपड उत्कटतेने लिहिली आहे. प्रचंड यातना सहन करूनही श्री भुजबळ यांची समाजसेवा अविरत चालू आहे. 'न्यूज स्टोरी टुडे' या पोर्टलच्या माध्यमातून विविध घडामोडी ते वाचकांपर्यंत पोहचवतात. तसेच प्रकाशन संस्थेच्या माध्यमातून त्यांनी अनेक लेखकांना लिहिते केले आहे.

नियोजन विभागात उपसंचालक या महत्त्वाच्या पदावर कार्यरत असलेल्या वर्षा भाकरे यांनी 'आई झाली अधिकारी' या लेखात त्यांनी या पदापर्यंत पोहोचताना स्वतः काय-काय झेलले, कोणत्या परिस्थितीतून त्यांना पुढे जावे लागले, नोकरी सांभाळताना, कौटुंबिक नाती जपताना, आई झाल्यावर कोणत्या तडजोडी कराव्या लागल्या ते सारे स्वतः मांडले आहे. त्यांची ही व्यथा बहुतांश सर्वच नोकरी, व्यवसाय करणाऱ्या महिलांची आहे. हा भावनात्मक लेख वाचताना हृदय कळवळून येते.

ध्येयपूर्तीसाठी झपाटलेल्या व्यक्तिंना ना आर्थिक, ना सामाजिक परिस्थिती अडवते ना शारीरिक व्यंग आडवे येते. जिथे शारीरिक दृष्ट्या सक्षम असणारांना जबाबदारी पेलताना नाकीनऊ येतात तिथे एक दृष्टीहीन महिला आत्मविश्वास, प्रामाणिकता, चिकाटी या गुणांमुळे एसबीआय सारख्या अग्रगण्य बँकेत महत्त्वाचे पद सांभाळते ते वाचताना वाचक निशब्द होतो. श्री भुजबळ यांनी सुजाता कोंडीकिरे ह्या महिलेचा मांडलेला जीवन वृत्तान्त वाचताना सुजाता यांच्याबद्दलचा आदर दुणावतो.

मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी सुरेश गोपाळे यांच्या 'एक पाखरु वेल्हाळ' या आत्मचरित्रात त्यांनी जी ससेहोलपट लिहिली आहे, मुंबई शहरात भीक मागत, थोर गायिका सुमनताई कल्याणपूर यांच्याकडे गाडी धुण्याचे काम करताना जीवनाला कंटाळून आत्महत्येचा विचार येतो, त्यावेळी कल्याणपूर यांचे पती नंदाशेठ सुमनताईंनी गायिलेले 'एक एक पाऊल उचली, चाल निश्चयाने...' हे गीत ऐकवले. त्यामुळे सुरेश गोपाळे यांचे नैराश्य दूर झाले आणि पुढे त्यांनी कधीच मागे वळून न पाहता पुढचा शैक्षणिक प्रवास आत्मविश्वासाने पार पाडून उच्च पदावर झेप घेतली.

काही अधिकारी असे असतात, जे चाललंय तेच पुढे चालवितात, काही अधिकारी मात्र जे सुरू आहे त्यात आपल्या कौशल्याची वेगळी भर घालून नवीन काहीतरी करण्याची ऊर्मी असलेले असतात! श्री चंद्रमणी इंदूरकर हे अधिकारी असेच नाविन्याचा ध्यास घेतलेले. 'जेल सुधरविणारा अधिकारी' लेखात श्री भुजबळ यांनी
श्री इंदूरकर यांच्या जीवनाचा आलेख तळमळीने मांडला आहे. ज्यामुळे अनेक अधिकाऱ्यांसाठी तो मार्गदर्शक ठरू शकेल.

श्री महेश खुटाळे यांचे थोडक्यात जीवन चरित्र मांडणारा 'खेळता खेळता अधिकारी' हा सौ. रश्मी हेडे यांचा लेख 'अशक्य ते शक्य' ही महती सांगणारा आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत श्री खुटाळे यश मिळविणारे खुटाळे त्यांचे गुरू श्री जगन्नाथ धुमाळ यांच्याबद्दल आदराने सांगतात, 'स्पष्टवक्तेपणा, सच्चेपणा, प्रामाणिकपणा, शिस्त व अतिशय कडक धोरण असल्यामुळे मी जीवनात यशस्वी होऊ शकलो व हीच गुरूंची शिकवण पुढे नेण्याचे काम मी करत आहे.'

प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे यांनी 'संघर्षातून झाली अधिकारी' या यश कथेत, पत्र्याच्या घरात राहून, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून नायब तहसीलदार या पदावर कार्यरत असलेल्या कु. प्राजक्ता बारसे या तरुणीचा उद्बोधक प्रवास सांगितला आहे. शिवखेरा यांचे एक वाक्य या सर्व लेख नायकांचे वेगळेपण ठसठशीतपणे दाखविणारे आहे. खेरा यांचा 'जितने वाले कोई अलग काम नही करते, वह हर काम अलग ढंग से करते है!' हा विचार आजच्या तरुणाईला खूप प्रेरक ठरावा असा आहे.

अंजू कांबळे अत्यंत महत्वाकांक्षी अशी विद्यार्थीनी! सेल्सगर्ल म्हणून काम करत असताना अंगभूत हुशारी, कष्ट करण्याची तयारी यामुळे अंजू यांचे लक्षवेधी मार्गक्रमण जवळून पाहणारे माहिती संचालक श्री भुजबळ यांनी यथोचित शब्दांत वर्णन केले आहे.

'फर्ग्युसन'चे सप्तर्षी' तसेच 'दीपस्तंभ'चे नवरत्न या दोन लेखांमध्ये श्री देवेंद्र भुजबळ यांनी पंधरापेक्षा अधिक मान्यवरांच्या यशस्वी वाटचालीचा ओघवत्या भाषेत आढावा घेतला आहे. चरणजित सिंग ही व्यक्ती 'आनंदी पापाजी' या नावाने परिचितांमध्ये परिचित आहे. 'करे करावे आप, मानूस के कुछ नहीं हाथ' गुरुबानीतील हा संदेश गुरूमंत्र समजून आनंदी वाटचाल करण्याऱ्या पापाजींचे कार्य सर्वांना तारक ठरेल यात शंका नाही.

'आम्ही अधिकारी झालो!' या पुस्तकातील व्यक्तिंचा प्रवास वाचताना कुठे मन आनंदाने भरून येते, कधी डोळे पाणावतात, कधी आश्चर्य वाटते, अभिमानाने ऊर भरून येतो. एक प्रेरक, स्फूर्तिदायक, मार्गदर्शक असे पुस्तक प्रकाशित केल्याबद्दल लेखक-संपादक श्री देवेंद्र भुजबळ यांना शतशः धन्यवाद!

आम्ही अधिकारी झालो : लेखसंग्रह

**लेखक- संपादक - देवेंद्र भुजबळ**
**प्रकाशक : सौ. अलका देवेंद्र भुजबळ**
**न्यूज स्टोरी टुडे, पब्लिकेशन नवी मुंबई**
**९८६९४८४८००**
**परिचय - नागेश शेवाळकर, पुणे**
**९४२३१३९०७१**

# संत रामपालजी महाराज यांच्या सत्य ज्ञानाचा महासत्संग!

**मुंबई । प्रतिनिधी -**
राम बुलावा भेजिया दिया कबीरा रोए ।
जो सुख हैं सत्संग में वो बैकुंठ में ना हो
रविवार.दि २०/०७/२०२५ रोजी मुक्तिधाम, शांतिधाम जोशी जागीर हाल पारसी वाड़ा,चकाला, साहर रोड अंधेरी ईस्ट ४०००९९येथे संत रामपाल जी महाराज यांच्या सत्य ज्ञानाचा महासत्संग आयोजित करण्यात आला आहे.



संत रामपाल जी महाराज यांचा सत्संग हा अध्यात्मिक मार्गदर्शनासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या सत्संगांमध्ये संत रामपाल जी महाराज मानवजातीला शाश्वत शांती, मोक्ष आणि खऱ्या धर्म ज्ञानाचा मार्ग दाखवतात.त्यांच्या प्रवचनांद्वारे श्रोते वेद, गीता, कुराण, बायबल आणि गुरु ग्रंथ साहिबातील सखोल ज्ञान आत्मसात करतात.

सत्संग आयोजनात संत रामपाल जी महाराज समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांड, व्यसन आणि भेदभाव नष्ट करण्यासाठी जनजागृती करतात.त्यांच्या

प्रवचनांमध्ये भक्ती मार्गाचा खरा अर्थ, ईश्वरप्राप्तीचा सुलभ मार्ग आणि साधनेचा महत्वाचा विषय स्पष्टपणे मांडला जातो. सत्संगात सहभागी होण्यासाठी कोणतेही शुल्क नसते, आणि सर्वांसाठी आणि सर्वांसाठी प्रवेश खुला असतो. येथे ( चाय बिस्केट ) पाणी व पार्किंग सुविधा उपलब्ध असते. या कार्यक्रमांमध्ये प्रवचन, आणि आत्मा शुद्धीकरणाचे तत्त्वज्ञान शिकवले जाते.

सत्संगाच्या माध्यमातून संत रामपाल जी महाराज हजारो लोकांना व्यसनमुक्त जीवन जगण्यासाठी प्रेरित करतात. त्यांच्या शिक्षणामुळे सामाजिक सुधारणा होत आहे आणि अनेक लोक आध्यात्मिक आनंद व समाधान अनुभवत आहेत. सत्संग ही मानवतेच्या उत्थानाची दिशा दाखवणारी प्रकाशमान ज्योत आहे.

# मराठवाडा चेंबर ट्रेड अँड कॉमर्सची आज व्यापार परिषद

## २८ वा वर्धापन दिननिमित्त छत्रपती संभाजीनगरमध्ये कार्यक्रमाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** मराठवाडा चेंबर ट्रेड अँड कॉमर्स या मराठवाडा व्यापी संघटनेचा येत्या २० जुलै रविवार रोजी २८ वा वर्धापन दिन साजरा होणार आहे. त्यानिमित्त मराठवाड्यातील सर्व व्यापारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसाठी व्यापार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री संजय शिरसाट, मंत्री अतुल सावे ,तर चेंबरचे वरिष्ठ मार्गदर्शक सत्यनारायण लाहोटी व व्यापार परिषद कार्यक्रमाचे अध्यक्ष मानसिंह पवार उपस्थित राहणार आहेत. या व्यापारी परिषदेत मराठवाड्यातील विविध व्यापारी संघटनेचे जवळपास तीनशे प्रतिनिधी उपस्थित राहतील. या परिषदेत मराठवाड्यात व्यापार / उद्योग करताना येणाऱ्या अडचणीवर चर्चा करण्यात येणार असून काही ठराव घेण्यात येणार आहे. राज्यात मराठवाडा विभाग हा मागासलेला विभाग म्हणून परिचित आहे. तसे पाहता मराठवाड्यात पर्जन्यमान कमीच असते. त्यामुळे पाण्याचा नेहमीच अभाव असतो ज्यामुळे व्यापारी/ उद्योजक वर्गाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. शासनाचे विविध कर भरून सुद्धा मराठवाड्यातील व्यापारी/ उद्योजकाला विशेष सुविधा मिळत नाही. नवीन तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी केंद्र व महाराष्ट्र सरकारने संपूर्ण मराठवाड्यात पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्यायला हव्यात. पण असे काही होत असताना दिसत नाही. जीएसटी रचना आल्यानंतर वन नेशन वन टॅक्सची घोषणा करण्यात आली तरी आजही औचित्य नसलेले कर व्यापारी वर्गावर लादले जातात. त्याविरुद्धही या परिषदेचे माध्यमातून आवाज उठविण्यात येणार आहे . इतर राज्यापेक्षा महाराष्ट्रात विजेचा दर जास्त असल्याने उत्पादन व विक्री किंमत वाढत असल्यामुळे इतर राज्याच्या उद्योजकांच्या स्पर्धेत येथील उद्योग टिकत नाही . तसेच वीज नियामक आयोगाने सोलार उत्पादित विद्युत वर आणलेली बंधने या विषयावर ही या परिषदेत चर्चा करण्यात येणार आहे. मराठवाड्यातील व्यापारी/ उद्योजक वर्गाच्या दैनंदिन समस्या सोडवण्यासाठी व या विभागातील व्यापारी/ उद्योजकांचे प्रश्न जाणून त्यांना योग्य ती मदत करणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# कस्तुरबा गांधी विद्यालय व न्यू वंडर स्कूल येथे लॉयन्स च्या वतीने वृक्षारोपण



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर लायन्स क्लबच्या माध्यमातून कस्तुरबा गांधी विद्यालय आंबा, व परतुर शहरातील न्यू वंडर स्कूल येथे, वृक्षारोपण करण्यात आले आहे. कस्तुरबा गांधी विद्यालय आंबा येथील मुलींनी सहभाग घेतला होता. यासर्व मुलींना लायनच्या माध्यमातून वृक्षारोपण ची माहिति व महत्व, काय असते पटवून देण्यातही आले.याप्रसंगी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील मुलींचे दृष्टी लॉयन्स नेत्रालय येथे मोफत नेत्र तपासणी करणार असल्याचे जाहीर केले. यावेळी नेत्रालयाचे अध्यक्ष,मनोहर खालापुरे,लायन्स क्लबचे अध्यक्षा, छाया सोळंके. सचिव,नीलिमा मसलकर. व कोषाध्यक्षा, रोहिणी बहिवाल. संजीवनी खालापुरे. भारती कासट. मधुकर भोसले. दिलीप टकले. सुनील कासट. लक्ष्मीकांत बहीवाल. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या मुख्याध्यापिका, ज्योती साळवे. शिक्षका,गोरे मॅडम. जाधव मॅडम. कुलकर्णी मॅडम. व विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लायन्स क्लबने परीश्रम घेतले होते.

# २० जुलैला छत्रपती संभाजीनगर येथे मंदिर-संस्कृतीच्या रक्षणार्थ 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषद' !

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** मंदिरे ही हिंदु धर्माची आधारशीला आहेत. त्यातून मिळणार्या ईश्वरी चैतन्यामुळेच आधुनिक काळातही समाज मंदिरांकडे आकर्षित होतो. त्यामुळे मंदिरांतील पावित्र्याचे रक्षण करणे, हे हिंदु समाजाचे दायित्व आहे. मंदिरातील देवतातत्त्व टिकवण्यासाठी मंदिरांत विधीवत पूजा-अर्चा करणे, प्राचीन मंदिर-संस्कृतीचे संवर्धन करणे, मंदिरांच्या समस्यांचे निवारण करणे, मंदिरात येणार्या भाविकांसाठी सुविधा उपलब्ध करून देणे, दर्शनरांगांचे सुनियोजन करणे, तसेच मंदिर परंपरांचे रक्षण करणे यांसाठी मंदिरांचे विश्वस्त, पुजारी, भक्त आदींचे संघटन आवश्यक आहे. त्यासाठी श्री काशी विश्वनाथ बाबा संस्थान, दत्त मंदिर, बीड बायपास, श्री पावन गणेश मंदिर, दिवाण, देवडी, सोमठाणा येथील श्री रेणुकामाता मंदिर, हिंदु जनजागृती समिती आणि महाराष्ट्र मंदिर महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने श्री काशी विश्वनाथ देवस्थान, दत्त मंदिर, बीड बायपास, देवळाई चौक येथे २० जुलै या दिवशी सकाळी ९ ते सायंकाळी ५.३० या वेळेत 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे'चे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेला छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड, परभणी या जिल्ह्यातील २०० हून अधिक मंदिराचे विश्वस्त, प्रतिनिधी, पुरोहित, मंदिरांच्या रक्षणासाठी लढा देणारे अधिवक्ते, अभ्यासक आदी सहभागी होणार आहेत, अशी माहिती मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांनी दिली आहे. या परिषदेला माजी धर्मादाय आयुक्त श्री दिलीप देशमुख, सनातनचे धर्मप्रचारक सद्गुरु नंदकुमार जाधव, श्री १००८ महामंडलेश्वर योगेशानंद गिरीजी महाराज या सर्वांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

या परिषदेमध्ये प्रामुख्याने श्री घृष्णेश्वर मंदिर संस्थान ट्रस्ट, श्री भद्रा मारुती मंदिर, श्री संस्थान गणपती, राजा बाजार, श्री सुपारी हनुमान मंदिर, गुलमंडी, श्री संत एकनाथ महाराज मंदिर, पैठण, श्री गणपती मंदिर, राजूर या मंदिरांचे विश्वस्त सहभागी होणार आहेत. या मंदिर परिषदेत मान्यवरांचे मार्गदर्शन, मंदिरांशी निगडीत विविध विषयांवर चर्चासत्रे होणार आहेत. यामध्ये 'मंदिरे सनातन धर्मप्रचाराची केंद्रे बनवणे', 'मंदिरे सरकारीकरण मुक्त करणे', 'वक्फ कायद्या'द्वारे मंदिरांच्या भूमीवर अतिक्रमण आणि मंदिरे बळकावणे यांवर उपाय, मंदिरे आणि तीर्थक्षेत्रे यांच्या परिसरात मद्य-मांस बंदी; दुर्लक्षित मंदिरांचा जीर्णोद्धार आदी विषयांवर चर्चा होणार आहे. ही परिषद केवळ निमंत्रितांसाठी असून यामध्ये सहभागी होण्यासाठी ८२०८४४३४०१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मंदिर महासंघाने केले आहे.

# माणगांव प्रेस क्लब पुरस्कृत आदर्श प्रगतशील शेतकरी पुरस्कार प्रदान सोहळा उत्साहात

**बोरघर । माणगांव । प्रतिनिधी -** माणगांव तालुका प्रेस क्लब आयोजित आदर्श शेतकरी पुरस्कार २०२५ सन्मान सोहळा माणगांव तालुका प्रेस क्लब चे पदाधिकारी, शेतकरी, विविध क्षेत्रातील मान्यवर आणि कृषी विभाग, पोलीस प्रशासन, महसूल प्रशासन, वनविभाग इत्यादी खात्याचे प्रशासकीय अधिकारी व स्थानिक नागरिक यांच्या उपस्थितीत गुरुवार दिनांक १७ जुलै २०२५ रोजी मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

जागतिक स्तरावर भारत हा कृषी प्रधान देश आहे. कृषी उत्पन्न, कृषी पुरक व्यवसाय हा देशाच्या अर्थ व्यवस्थेचा कणा आहे असे मानले जाते. बळीराजा अर्थात शेतकरी हा सार्या जगाचा पोशिंदा आहे असे म्हटले जाते. कारण उन, वारा आणि पाऊस याची पर्वा न करता निसर्गाचा लहरीपणा अवर्षण, प्रवर्षण, दुष्काळ इत्यादी नैसर्गिक स्थितीतअत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शेतकरी आपल्या शेतात अहोरात्र प्रचंड मेहनत करून आपले रक्त आटवून शेतातून विविध प्रकारचे अन्न धान्ये, तृणधान्य, भाजीपाला, फुलशेती, फळपिके, गायी म्हशी पालनाच्या माध्यमातून दुग्धोत्पादन, मत्स्य व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळी पालन, वराह पालन, मधुमक्षिका पालन आणि औषधी वनस्पती इत्यादी शेतमालाची निर्मिती करून आपल्या सर्वांचे निरंतर पोषण करत असतो म्हणून तो समस्त जगाचा पोशिंदा आहे. अशा या जगज्जेत्या बळीराजाच्या अर्थात शेतकरी राजाच्या अपार कष्टाची दखल घेत त्याच्या या परोपकारी कार्याचा कुठेतरी सन्मान, गौरव व्हायलाच पाहिजे या शुद्ध प्रामाणिक भावनेतून माणगांव तालुका प्रेस क्लब ने आपले सामाजिक उत्तरदायित्व समजून आदर्श शेतकरी पुरस्कार सन्मान सोहळ्याचा संकल्प केला. या संकलपने नुसार प्रतिवर्षी तालुक्यातील किमान दोन प्रगतशील शेतकर्यांची निवड करून त्यांना माणगांव तालुका प्रेस च्या वतीने त्यांच्या शेताच्या बांधावर जाऊन त्यांना शाल, पुष्पगुच्छ, स्मृतीचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन त्यांना जाहीर कार्यक्रमात गौरवण्यात येते.

या वर्षी माणगांव तालुका प्रेस क्लब च्या माध्यमातून माणगांव तालुक्याच्या इंदापूर विभागातील माकटी या गावचे प्रगतशील शेतकरी गणपत गोविंद मुरकर हे गेली सहा दशके आपल्या शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विविध प्रकारच्या पिकांच्या माध्यमातून भरघोस उत्पन्न घेऊन आपला कौटुंबिक चरितार्था बरोबर देशाच्या अर्थ व्यवस्थेला मजबूत करण्यासाठी हातभार लावतात. तसेच माणगांव तालुक्याच्या निजामपूर विभागातील चाच गावचे प्रगतशील शेतकरी सहदेव सदू नाकते आणि सुजाता सहदेव नाकते या उभय दाम्पत्य प्रगतशील शेतकर्यांची निवड या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. हे उभय दाम्पत्य प्रगतशील शेतकरी आपल्या पारंपरिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञान व पूरक व्यवसायाची जोड देऊन आपल्या शेतात यशस्वी रीत्या खेकडा पालन करतात त्यांच्या या व्यवसायातून त्यांचा कौटुंबिक चरितार्थासह देशाच्या अर्थ व्यवस्थेला मजबूत करण्यासाठी हातभार लावतात. या दोन्ही सन्मानित प्रगतशील शेतकर्यांचा आदर्श आजच्या नवीन पिढीने घेण्या सारखा आहे. म्हणून त्यांचा सन्मान करताना माणगांव तालुका प्रेस क्लब ला अभिमान वाटतो.

सदर कार्यक्रमास माणगांव तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष पत्रकार संतोष सुतार, उपाध्यक्ष विश्वास गायकवाड, उपाध्यक्षा आरती म्हामुनकर, मुख्य संघटक पद्माकर उभारे,कार्याध्यक्ष गौतम जाधव, सल्लागार उत्तम तांबे, सल्लागार विनोद सापळे, खजिनदार सचिन वनारसे, तालुका कृषी अधिकारी किरण पडवळकर, कृषी सहाय्यक बांगर, सहायक पोलीस निरीक्षक नरेंद्र बेलदार, पोकॉ. दहिफळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र युवा सचिव, भूवन ग्रामपंचायतीचे सरपंच दिपक जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला कार्यकर्त्या श्रद्धा यादव,इंदापूर माजी उपसरपंच उदय अधिकारी, उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी डॉ. संदिपान सानप, तहसीलदार दशरथ काळे, वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत शिंदे, तलाठी साळवे, लक्षमण गोरेगावकर, गणपत डवले, दोन्ही ठिकाणचे शेतकरी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भोकरदन येथे २२ जुलै रोजी पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र ,जालना अणि मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय भोकरदन यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि. २२ जुलै, २०२५ रोजी मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय भोकरदन येथे सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. यासाठी अंदाजे ३२७ पेक्षा अधिक रिक्त पदे उपलब्ध होणार आहेत. तरी या रोजगार मेळाव्याचा जास्तीत जास्त उमेदवारांनी उपस्थित राहुन लाभ घ्यावा, असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाने प्रसिध्दीपत्रकाद्वारे आहे.

रोजगार कार्यालयाकडील नोंदणीकृत सुशिक्षित महिला व पुरुष उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी सहाय्य होण्याच्या दृष्टीने हा रोजगार मेळाव्याचे आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात रोजगार देणाऱ्या विविध नामांकित कंपन्या व नियोक्ते उपस्थित राहुन व प्रत्यक्ष मुलाखती घेवून उमेदवारांची निवड करणार आहे. सदर मेळाव्यामध्ये नियोक्त्यांकडून ३२७ रिक्तपदे एसएससी, एचएससी, कोणतेही पदवीधर, आयटीआय ट्रेडधारक (फिटर, वेल्डर, इलेक्ट्रीशियन, मशिनिष्ट, अप्रेन्टीस ट्रेनी,अकाउंटंट असिस्टंट,डाटा एन्ट्री ऑपरेटर, सर्व्हिस अॅडव्हायझर इत्यादी) १८ ते ४५ वयोगटातील पात्रताधारक उमेदवारांसाठी पदे उपलब्ध झाली आहेत.

तसेच या मेळाव्यात स्वयंरोजगाराबाबत अर्थसहाय्य करणाऱ्या विविध शासकीय महामंडळाचे स्टॉल लावण्यात येणार असुन विविध योजनांचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. याचबरोबर स्टॉलच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनाअंतर्गत विनामुल्य असलेले विविध रोजगारक्षम कौशल्य प्रशिक्षणाची माहिती देऊन नोंदणी करण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर भेट देऊन आगामी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा या सदराखालील जालना जिल्हा निवडून पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यामधील तपशिल पहावा. याबाबत काही अडचण असल्यास मदतीसाठी कार्यालयाच्या ०२४८२-२९९०३३ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा किंवा jalnarojgargmail.com या ई-मेलद्वारे संपर्क साधावा.

**झाडे लावा**

**झाडे जगवा**




## शेख महेमुद यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश



**राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट) प्रदेश अध्यक्ष खा. सुनिल तटकरे यांच्या प्रमुख उपस्थित आज जालना शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख महेमुद यांचा सह असंख्य करकर्त्यांनी पक्षात जाहिर प्रवेश केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा अध्यक्ष माजी आमदार अरविंद चव्हाण, आमदार विक्रम काळे, ॲड. नाजेर काजी, शहर जिल्हा अध्यक्ष अ. रशिद पहलवान, स. जमील अहेमद रिजवी, शाहआलम खान, अण्णासाहेब चितेकर, मिर्झा अन्वर बेग, कय्युम खान, धैर्यशील चव्हाण व अन्य मान्यवर उपस्थित होते. (छाया - जावेद तंबोली)**

## जालना जिल्ह्यात सरासरी ४ मि.मी. पावसाची नोंद

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात दि. १८ जुलै २०२५ रोजी सकाळपर्यंतच्या मागील २४ तासात सरासरी ४.६० मि.मी एवढ्या एकूण पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यात झालेल्या पावसाची तालुकानिहाय आकडेवारी मि.मी. मध्ये पुढीलप्रमाणे असून कंसातील आकडेवारी यंदाच्या एकूण पावसाची आहे. जालना- १६.१० (३१.७०), बदनापूर- ८.४० (३५.२३), भोकरदन- 0.00 (३९.५४), जाफ्राबाद- 0.६0 (४0.६३), परतूर- १.८0(२२.५0), मंठा- ३.७0(२0.४९), अंबड- २.१0 (२५.२३), घनसावंगी- २.६0 (२८.७९) मि.मी. पावसाची नोंद करण्यात आली आहे. जिल्ह्यात आज पर्यत एकुण ३0.९१ मि.मी. एवढ्या पावसाची नोंद करण्यात आली आहे.

# महिला व बालकांचे संरक्षण ही सामूहिक जबाबदारी - ॲड. सौ. अश्विनी धन्नावत

### कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात पॉश व पोस्को कायद्यावर मार्गदर्शन

**जालना । प्रतिनिधी -** कामाच्या ठिकाणी महिलांचा सन्मान आणि बालकांचे संरक्षण ही केवळ कायदेशीर जबाबदारी नसून सामाजिक बांधिलकी आहे, असे मत बाल न्याय मंडळाच्या सदस्या ड. अश्विनी धन्नावत यांनी व्यक्त केले.

जालना शहराजवळील टी. व्ही. सेंटर भागातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात आयोजित पॉश व पोस्को या कायद्यासंदर्भातील मार्गदर्शन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. व्यासपीठावर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती एम. के. पवार यांची उपस्थिती होती.

ॲड. धन्नावत यांनी पॉश कायद्याची माहिती देताना स्पष्ट केले की, महिलांना कामाच्या ठिकाणी सुरक्षित आणि सन्मानजनक वातावरण मिळावे ही प्राथमिक अपेक्षा आहे. अंतर्गत तक्रार समिती, तक्रार प्रक्रियेची पारदर्शकता आणि कायद्यातील जबाबदाऱ्या याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. पोस्को कायद्यासंदर्भात बोलताना त्यांनी बालकांवरील अत्याचार प्रकार, त्यांना ओळखण्याची लक्षणे, तक्रार दाखल करण्याची बंधनकारक जबाबदारी, आणि शिक्षण



संस्थेची भूमिका यावर प्रकाश टाकला. बालकांच्या हितासाठी आपण सर्वांनी सजग असणे आवश्यक आहे, असे त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षिका के. एस. दाभाडे, ए. आर. सूर्यवंशी, एस. आर. गायकवाड, टी. एस. कुंटे, एस. डी. पिसाळ, एस. आर. तसेवाल, एस. आर. माटोले, एस. एम. शिंदे, व्ही. आर. भोरे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी दीडशे विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका के. एस. दाभाडे यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार मुख्याध्यापिका एम. के. पवार यांनी मानले.

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनापुर्वीच SDPI च्या पदाधिकाऱ्यांना पोलीसांनी घेतले ताब्यात; आंदोलनाची परवानगी नसल्याचे पोलीसांची माहीती

**जालना । प्रतिनिधी -** मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळातील घोटाळ्याविरोधात एसडीपीआयच्या वतीने राज्यव्यापी धरणे आंदोलन करण्यात येत होते. त्या अनुषंगाने जालन्यांमध्ये एसडीपीआयचे पदाधिकारी आज दिनांक १८ शुक्रवार रोजी दुपारी तीन वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यासाठी जमले असता आंदोलनापूर्वीच कदीम जालना पोलिसांनी एसडीपीआयच्या पदाधिकाऱ्यांना ताब्यात घेतले. सदरील आंदोलनासाठी पोलिसांनी एसडीपीआयला परवानगी नाकारली असल्याचे कारण पोलिसांनी दिले आहे.

पोलीसांनी पदाधिकाऱ्यांना कदीम जालना ठाण्यात जमा केले आहे.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.